# 'घरांच्या मागणीवर परिणाम होणार नाही'

पुणे, दि. २८ - सध्या चलनवाढीमुळे एकूणच वातावरण जरासे नकारात्मक असले ती त्यामुळे घरांच्या मागणीवर फारसा परिणाम होणार नाही, असे मत शोभा डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक जे. सी. शर्मा यांनी व्यक्त केले.



जे. सी. शर्मा

ते म्हणाले की, घरांच्या किमती काही प्रमाणात वाढत असल्या तरी मुळातच घरांची मागणी जास्त आहे. शोभा गारनेट फेज तीन या प्रकल्पाची घोषणा केल्यानंतर बोलताना त्यांनी सांगितले की, रियल इस्टेट क्षेत्रासाठी नियंत्रक आल्यास हे क्षेत्र आणखी शिस्तीत विस्तारित होण्याची शक्यता आहे. यावेळी शोभा डेव्हलपर्सचे पुणे विभागाचे प्रमुख सुधीर बापट उपस्थित होते. आमच्या सर्व प्रकल्पांना पुण्यात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.